ISSN: 2230-7850 Impact Factor :4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 8 | September - 2016

ISRJ Indian Streams Research Journal

# शेतक–यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय

*प्रा. सुरेश सिताराम नाळे*
*आय. सी. एस. महाविद्यालय,खेड ता. खेड, जि. रत्नागिरी .*

*सारांश:*

भारतीय अर्थव्यवस्थेपुढील अनेक आर्थिक, सामाजिक समस्या आहेत. लोकसंख्यावाढ, दारिद्रय, बेकारी, भ्रष्टाचार, वाढती महागाई, पायाभूत सुविधांची टंचाई याबरोबरच भारतीय अर्थव्यवस्थेसमोर शेतक–यांच्या आत्महत्या ही एक महत्वाची समस्या निर्माण झाल्याचे दिसून आले आहे. स्वातंत्र्यपुर्व आणि स्वातंत्रोत्तर काळात शेतक–यांच्या आत्महत्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते.

*प्रस्तावना:*

जागतिकीकरणाच्या अश्वमेधमध्ये आरूढझालेल्या कृषीप्रधान भारतीय अर्थव्यवस्थेत शेतक–यांच्या वाढत्या आत्महत्या हा गंभीर व संशोधनाचा विषय असून शासनकर्ते, समाजसेवक व अभ्यासक यांना चिंतक स्वरूप निर्माण करणारा आहे. भारतामध्ये आंध्रप्रदेश, कर्नाटक, पंजाब, महाराष्ट्र इत्यादी राज्यात शेतक–याच्या आत्महत्यांचे प्रमाण सर्वाधिक आहेत. भारतीय शेतकरी जगतील इतर शेतक–यांपेक्षा अहोरात्र काबाडकष्ट करणा–या व कणखर असणा–या शेतक–यांना आयुष्यभर विविध समस्यांचा मुकाबला करीत असताना अनेकवेळा घायाळ होतो. त्यामुळेच आत्महत्येसारख्या प्रवृत्ती उदयास येतात. अशा प्रवृत्तींच्या मुळाशी जाउन प्रभावी उपाय करणे अगत्याचे आहे.

*उद्दिष्टे:*

१. शेतक–याला आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त करणा–या आर्थिक, सामाजिक परिस्थितीचा अभ्यास करणे.



२.शेतक–यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

*अ) नैसर्गिक कारणे :*

*1) दुष्काळ:*

भारतीय कृषी अर्थव्यवस्थेला सतत दुष्काळाशी मुकाबला करावा लागतो. दुष्काळाचे फार मोठे परिणाम शेतक–यावर होतात. दुष्काळामुळे शेतक–यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत बंद होतात.

*2) अतिवृष्टी व गारपीट:*

भारतामध्ये मान्सून हा लहरी स्वरूपाचा असून काही प्रदेशात जास्त पाऊस पडून अतिवृष्टी व गारपीट होऊन हातातोंडाशी आलेली पिके नष्ट होतात. अतिवृष्टीमुळे नगदी पिके जमीनदोस्त होतात. तसेच गारपीटामुळे फळफळावळी नष्ट होतात. त्यामुळे शेतक–यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत बंद होते.

*3) हवामान:*

हवामान हा नैसर्गिक घटकांपैकी एक महत्वाचा घटक असून शेतीवर परिणाम करतो. भारतीय हवामान विषम असल्याने वेगवेगळी पिके घेतली जातात; परंतु जास्त तापमानवाढ व कमी तापमान याचा शेती उत्पादनावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम होतो. ऋतुमानानुसार हवामानावर विषमता आल्यास पिकांवर अनिष्ठ परिणाम होतो.

*4) रोगराई:*

हरितक्रांतीनंतर नवीन तंत्र, पिकांच्या नवीन जाती विकसित झाल्या आहेत; पंरतु नवनवीन जाती अतिशय नाजूक असल्याने त्यावर किडीचा किंवा रोगांचा प्रार्दुभाव लवकर होण्याची शक्यता असते. त्यामुळे पीके रोगराईस लवकर बळी पडतात. त्यामुळे शेतक–यांचे नुकसान होते.

*5) भूकंप:*

भूकंपासारख्या नैसर्गिक कारणामुळे संपूर्ण शेती उध्वस्त होते. भूकंपामुळे संपूर्ण पीके नष्ट होतात. शेतक–यांचे आयुष्य उध्वस्त होते. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करतात.

*ब) आर्थिक कारणे :*

*1) कर्जबाजारीपणा:*

भारतीय शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जात जीवन जगतो व कर्जात मरण पावतो. या उक्तीप्रमाणे शेतक–यावर कर्जाचे ओझे जन्मभर असते. या कर्जाची परतफेड होत नाही. कर्जफेडीचा तगादा फार जाचक असल्यामुळे शेतकरी आत्महत्या करतात.

*2) प्रतिकुल परीस्थिती:*

अल्पभूधारक, सीमांत भूधारक अशा शेतक–यांची

आर्थिक परिस्थिती प्रतिकुल असल्यामुळे पतहिनतेमुळे कर्ज मिळत नाही. मुलीचे लग्न होत नाही, मुलांचे शिक्षण अर्धवट होते, समाज मदत करीत नाही. नातेवाईक मदत करीत नाहीत, त्यामुळे शेतकरी आत्महत्या करतात.

*3) पुरेशा व स्वस्त आणि जलद कर्जपुरवठयाचा अभाव:*

भारतीय वित्तप्रणाली अतिशय गुंतागुंतीची असल्यामुळे शेतक-यांना जलद कर्जपुरवठा होत नाही. अनेक प्रकारचे कागदपत्र, जामीनदार, कर्जखर्च जास्त, कर्जमंजुरीत भ्रष्टाचार या कारणांमुळे कर्ज महाग होतात. शिवाय न्यूनतम वेळेत कर्ज मिळत नाही. शिवाय कर्जरक्कम कमी, या कारणांमुळे कर्जाचा वापर योग्य त्या कारणासाठी होत नाही. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होऊन आत्महत्या करतात.

*4) खाजगी सावकारी कर्जाचे भरमसाठ व्याजदर:*

खाजगी सावकारी कर्ज ग्रामीण भागात लोकप्रिय असले तरी त्यांचा व्याजदर भरमसाठ आहे. मुद्दल रकमेपेक्षा जास्त होते. सावकारी कर्जाची वसुली, जाचक व दांडगाईने करतात. त्यामुळे शेतक-यांची मानहानी होते.

*5) कर्जवसूली दंडक व तगादा:*

शेतक-यांच्या कर्ज थकबाकीच्या वसुलीसाठी अनैतिक मार्गाचा अवलंब केला जात असे. शेतक-यावर जप्ती, लिलाव, जबरदस्ती असा दंडक लावल्यामुळे शेतक-याची मानहानी होते. त्यामुळे शेतकरी आत्महत्या करतात.

*क) सामाजिक कारणे :*

*1) नैराश्यवाद:*

विविध कारणांमुळे शेतीचे नुकसान झाल्यास शेतकरी वैफल्यग्रस्त होऊन त्याच्यात नैराश्यवाद निर्माण होतो. शिवाय शेतमजूर म्हणून जाता येत नाही. त्यामुळे नैराश्यातून आत्महत्या करतात. त्यांच्यामध्ये मानसिक आधाराचा अभाव दिसून येतो.

*2) अपमानास्पद वागणूक:*

भारतीय समाजात आर्थिक संकटात सापडलेल्या सर्वसामान्य शेतक-यांना तिरस्कार नजरेने पाहिजे जाते. तसेच सतत अपमानास्पद वागणूक दिली जाते. त्यातून आत्महत्या होतात.

*3) कौटुंबिक कलह:*

शेतक-यांच्या कुटुंबामध्ये आर्थिक ताणतणाव निर्माण झाल्यास कुटुंबात सतत भांडणतंटा निर्माण होतो. कुटुंबप्रमुखांच्या उत्पन्नात संसार चालविणे अवघड होते. त्यातून कौटुंबिक भार निर्माण होऊन शेतकरी व्यसनाच्या आहारी जाऊन आयुष्य संपवितो.

*4) भावबंदकीतील वादविवाद:*

भारतीय शेतक-यांमध्ये रस्ता, पाण्याचा घाट, बांधबंदिस्त, पिकांचे नुकसान या कारणामुळे सतत वादविवाद होतात. या वादविवादाला कंटाळून शेतकरी आत्महत्या करतात.

*5) अंधश्रद्धा, अज्ञान व धर्मांधता:*

भारतीय अर्थव्यवस्थेत अंधश्रद्धा पसरविण्याची अफवा फार मोठी आहे. त्याचा प्रथम बळी आर्थिकदृष्टया कमकुवत शेतकरी ठरतो तसेच अज्ञानापोटी तो बळी पडतो. त्याचप्रमाणे धर्मांधतानुसार सतत जोखडला जातो. त्यातून आत्महत्या करीत आहे.

*उपाययोजना :*

*1) कर्जमाफी व व्याजमाफी:*

शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कर्जबाजारी शेतक-यांचे व सीमांत आणि अल्पभूधारक शेतक-यांचे कर्जमाफीचे धोरण राबविले पाहिजे; परंतु कर्जमाफीपेक्षा व्याजमाफी देऊन जुने कर्जाचे रूपांतर नवीन कर्जात केल्यास शेतक-यांच्या आत्महत्येचे प्रमाण कमी होईल.

*2) सहकारी संस्थांचे सक्षमीकरण:*

भारतातील शेतक-यांच्या विविध कार्यकारी पतसंस्था थकबाकीत आहेत. शिवाय त्याचप्रमाणे सहकारी बँका भ्रष्टाचार, गचाळ कारभार, थकबाकी या कारणामुळे तोटयात आहेत; परंतु या संस्थांवर व कृषी पतसंस्थांवर कडक अटी व शर्ती लावून सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. वैदयनाथ समितीच्या मते सहकारी संस्थांचे सक्षमीकरण अवघड असले तरी आवश्यक आहे. कारण तळागाळातपर्यंत या संस्थांचे जाळे असून शेतीला कर्जपुरवठयामध्ये अग्रभागी असतात.

*3) कृषी कर्जफेड निधीची स्थापना:*

केंद्र सरकार, राज्य सरकार व बँका यांनी संयुक्तपणे असा निधी स्थापन केल्यास दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, महापूर, रोगराई अशा नैसर्गिक आपत्तींच्या नुकसानीची भरपाई करता येईल यातून संकटग्रस्त शेतक-यांचे कर्ज व त्यावरील व्याज माफ केल्यास शेतक-यांना दिलासा मिळून आत्महत्या रोखता येतील.

*4) पूरेसा व स्वस्त कर्जपुरवठा:*

कृषी आदानाच्या वाढत्या किमती, नफ्याचे घटते प्रमाण त्यामुळे शेतक-यांना ४ः दराने जलद व वेळेत कर्जपुरवठा राष्ट्रीयीकृत व खाजगी बँकांनी करावा. सध्या हा दर ६ः पिक कर्जाचा बाबत असले तरी शेतीविषयक अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीच्या सर्व कर्जांना समान व्याजदर ठेवावा. राष्ट्रीयीकृत बँकांचे मोटार, गृहकर्ज यावरील व्याजदरापेक्षा शेतीवरील व्याजदर जास्त आहे. शेतक-यांनी मुदतीपूर्व कर्ज फेडल्यास व्याजदरात सवलत दयावी.

*5) कृषीकर्जाबरोबर उपभोग्य कर्ज:*

भारतातील बहुसंख्य शेतकरी कृषीकर्जाचा वापर बिगरशेती कारणासाठी करतात, तसेच अनुत्पादक कारणासाठी करतात. त्यामुळे शेतीस भांडवल कमी पडते त्याचा परिणाम उत्पादकता कमी होते. त्यामुळे उत्पन्न कमी होते. त्यातून कर्जाची परतफेड होत

